# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मु.) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmchq@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/१९८ /२०२६-२७
दि. २४/०९/२०२६

**परिपत्रक**

**विषय : गणेशोत्सवाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी करावयाच्या बाबी.**

**संदर्भ : जा.क्र.मनपा/उपा-४/१३६/२०२६-२७, दि. २२/०९/२०२६ रोजीचे पत्र.**

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवाचा वारसा जतन करणे तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची कला, संस्कृती, परंपरा, लोकजीवन व सामाजिक एकोपा यांचा व्यापक प्रचार व प्रसार करण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत शासनामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना स्वःताच्या घरी, आपले नातेवाईक, परिसरातील मित्रमंडळी यांच्या मध्ये गणेशोत्सवाशी संबंधित पारंपारिक कला, संस्कृती व पर्यावरणपूरक उपक्रमांबाबत जनजागृती करण्यात यावी. तसेच Bappa.org या संकेतस्थळावर घरगुती गणपती व सार्वजनिक गणेश मंडळांची नोंदणी करण्याबाबत प्रोत्साहित करावे. गणेशोत्सवातील वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक पध्दती, कला सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम इत्यादींची माहिती उपलब्ध असल्यास त्याचा प्रचार व प्रसार करण्यात यावा.

महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेचे दस्तऐवजीकरण, जतन व जागतिक पातळीवर प्रसार करण्याचे हे ऐतिहासिक कार्य आहे. त्यामुळे सदर उपक्रमास सर्वोच्च प्राधान्य देऊन, व्यापक लोकसहभागातून तो यशस्वी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख, मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :**

**मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका**